# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 12/10/2019 (शनिवार)
# (दुपार)

---

## स्थानिक गुन्हे शाखा पोलीसांची कारवाई

स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पोलीस पथक दि. 11/10/2019 चे नागपूर उपविभागातील पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असतांना मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे पो.स्टे एमआयडीसी बोरी हद्दीमध्ये विठ्ठल रूकमिनी मंदीर परिसर टाकळघाट येथे सार्वजनिक ठिकाणी मुंबई पोलिस जुगार अधिनियमान्वये छापा कारवाई केली असता घटनास्थळावर आरोपी 1) बाडु राघो वाघदे, मांडवा व 2) पिंटु भगत, टाकळघाट हे सट्टापटीचे आकडे लिहुन खायवाडी करुन सट्टापट्टीचा जुगार खेळतांना मिळून आले. आरोपीतांविरुद्ध मुंबई पोलिस जुगार अधिनियम कलम 12 (अ) सहकलम 109 जाफौ अन्वये पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. घटनास्थळावरुन रोख रकमेसह सट्टापट्टी जुगारा संबधीत एकुण 2,445/– रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वरील कारवाईचे यशस्वी आयोजन मा. श्री. राकेश ओला पोलिस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्रीमती मोनिका राऊत अपर पोलिस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, यांचे सह स्टाफ पोहवा महेश जाधव, गजेन्द्र चौधरी, नापोशि रामा आडे, सुरेश गाते यांनी केली.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 03 कि.मी अंतरावर अन्नामोड येथे दिनांक 08/10/2019 चे 03.00 वा. दरम्यान योगेश उर्फ योगराज सुधाकर पहाडे, वय 19 वर्ष, रा. वार्ड नं 01 चिचोली खापरखेडा हा मोटरसायकलने खापरखेडा येथे घरी जात असतांना यातील 5 विधीसंर्घषग्रस्त बालकांनी फिर्यादीस थांबवुन म्हणाले की, ‘आम्हाला कोराडी येथिल देवी दर्शनाला जायचे आहे आमच्या कडे पैसे नाही पैसे दे.’ याकारणावरून आरोपीने वादविवाद करून खिशात असलेला चाकु काढुन फिर्यादीच्या मांडीवर डाव्या हातावर चाकुने मारहाण करून जखमी केले. आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी तयार करून फिर्यादीस शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,147,148,149,326,504,506 भादंवी, सह कलम 135 मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील 3 विधीसंर्घषग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ रामेश्वर कटरे 9922420496 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

1) पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 09 कि. मी अंतरावर मौजा इंदोरा शिवार शेत दिनांक 11/10/2019 चे 09.30 वा. चे पुर्वी फिर्यादी नामे– रघुवंशी सत्यनारायण परचुरी, वय 29 वर्ष, रा. कोदामेंढी हा टेक्याचे शेतामध्ये धानाचे पीकावर मजुरासह फवारणी करण्याकरिता गेला होता. दरम्यान फिर्यादीला रायणी यांच्या शेताचे सिमेंट पायलीच्या आतमधुन वास येत होता जवळ जावुन पाहीले असता सिमेंट पायलीमध्ये एका अनोळखी पुरूष वय 40 ते 45 वर्ष याचे प्रेत कुजलेल्या अवस्थेत दिसून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. सोनवने 8805730362 हे करीत आहेत.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 05 कि. मी अंतरावर मौजा चिचाळा दिनांक 11/10/2019 चे 06.00 वा. ते 06. 30 वा. चे दरम्यान फिर्यादी नामे– सतीशकुमार सरसलाल गयगये, वय 29 वर्ष, रा. चिचाळा हा पेच कालव्याकडील शेताकडे जात असता त्यास नहराचे पाण्यामध्ये एक अनोळखी वय 25 ते 36 वयोगटातील प्रेत तारांला अडकवुन दिसला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार काटे हे करीत आहेत.

3) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 06 कि. मी अंतरावर रिधोरा डॅमचे काटोल कोंढाळी रोडलगत असलेल्या डॅमच्या भिंतीलगत पाण्यामध्ये दिनांक 11/10/2019 चे 15.15 वा. चे पुर्वी काटोल शिवारातील रिधोरा डॅमचे पाण्याच्या वर एका अनेळखी पुरूषाचे प्रेत वर तरंगतांना दिसले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. सुषमा भुषण मुसळे(पोलिस पाटील), वय 30 वर्ष, रा. वार्ड क्र. 4, रिधोरा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार जयसिंग पावार हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर